# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दू. क्र. : ०२२ ६६४०५०६६, ६६४०६०६७, ६६४०५०७७ संकेतस्थळ : https://mhada.gov.in


जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/६५८ दि.०२/०३/२०२१

प्रसिद्धी पत्रक

## म्हाडा संक्रमण शिबिरातील भाडेकरू / रहिवाशांकडून अभय योजनेला उत्तम प्रतिसाद

पहिल्या टप्प्यात भाडेकरू / रहिवाशांकडून सुमारे ३ कोटी ८५ लाख रुपये भाडेवसुली

मुंबई, दि. ०२ मार्च, २०२१ :- कोरोना साथरोगाच्या पार्श्वभूमीवर लागू टाळेबंदीमुळे सर्वसामान्यांच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या विपरीत परिणामांची बाब विचारात घेऊन म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील २१ हजार १४९ संक्रमण शिबिर गाळ्यांमधील भाडेकरू/ रहिवाशी यांच्यासाठी जाहीर अभय योजनेला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यांतर्गत दि. २८ फेब्रुवारी, २०२१ पर्यंत एकूण ३ कोटी ८४ लाख ७९ हजार ४०४ रुपये प्रलंबित / थकीत भाडे भाडेकरू / रहिवाशांनी भरले आहे, अशी माहिती मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती श्री. विनोद घोसाळकर यांनी आज दिली.

श्री. घोसाळकर म्हणाले की, पहिल्या टप्प्यांतर्गत संपूर्ण थकीत भाडे रकमेची मुद्दल भरणाऱ्या संक्रमण शिबिर गाळ्यांतील भाडेकरू/रहिवाशांना एकूण व्याजामध्ये ६० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात आली आहे. या योजनेला प्रतिसाद दिल्याबद्दल संक्रमण शिबिरातील भाडेकरू / रहिवाशी यांचे श्री. घोसाळकर यांनी आभार मानले व अभय योजना यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अरुण डोंगरे, उपमुख्य अधिकारी (संक्रमण गाळे) श्री. तुषार राठोड, संबंधित मिळकत व्यवस्थापक, भाडेवसुलीकार यांचे कौतुक केले.

योजनेच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत संक्रमण शिबिर गाळ्यातील भाडेकरू/रहिवाशी यांनी दि. ३१ मार्च, २०२१ पर्यंत संपूर्ण थकीत भाडे रकमेची मुद्दल भरल्यास एकूण व्याजामध्ये ४० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाणार आहे. याचाही लाभ घेण्याचे आवाहन श्री. घोसाळकर यांनी केले.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिर गाळ्यांमध्ये राहणाऱ्या भाडेकरू / रहिवाशी यांच्याकडे मोठ्या प्रमाणात भाडे व त्यावरील व्याजापोटी एकूण रु. १२९.९२ कोटी रक्कम थकीत आहे. या योजनेअंतर्गत जे भाडेकरू/ रहिवाशी संपूर्ण थकित रक्कम भरतील त्यांनाच ही सवलत लागू राहील.

या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या विविध विभागांनी दि. २८ फेब्रुवारी, २०२१ रोजी पर्यंत केलेली भाडेवसुली पुढीलप्रमाणे –

| **अनु. क्र.** | **विभाग** | **भाडेवसुली** |
|---|---|---|
| १) | **अ विभाग** | रु. ११ लाख ५६ हजार ३५९ |
| २) | **ब २ विभाग** | रु. १ लाख ८१ हजार ९०७ |
| ३) | **सी १ विभाग** | रु. ८ लाख ७५ हजार ३८२ |
| ४) | **सी २/३ विभाग** | रु. ८ लाख ९९ हजार ५३ |
| ५) | **डी १ विभाग** | रु. २ कोटी ४ लाख ९२ हजार ९८९ |
| ६) | **डी २ विभाग** | रु. ३ लाख ३४ हजार १४० |
| ७) | **डी ३ विभाग** | रु. ५१ हजार ७५ |
| ८) | **ई १ विभाग** | रु. ११ लाख ४५ हजार ३४६ |
| ९) | **ई २ विभाग** | रु. ३२ लाख १७ हजार ५०० |
| १०) | **ग दक्षिण विभाग** | रु. २७ लाख ८९ हजार ९५८ |
| ११) | **ग उत्तर विभाग** | रु. ११ लाख ०७ हजार ४१२ |
| १२) | **फ उत्तर विभाग** | रु. १८ लाख ८७ हजार ३१९ + रु. २२ लाख ५१ हजार ५६४ |
| १३) | **फ दक्षिण विभाग** | रु. २० लाख ८९ हजार ४०० |
| **एकूण** | | रु. ३ कोटी ८४ लाख ७९ हजार ४०४ |

------- *********-------